श्रीशंकर प्रसन्न.



गंधर्व गायन सार.

भाग १ ला.

पद—सौभद्र [रागिनी—आनंद भैरवी]

किति किति सांगूं तुला मज चैन नसे ॥ हें दुःख तरी मी साहुं कसें ॥ या समयीं मला नच कोणी पुसे ॥ हा विरह सखे मज भाजितसे ॥ चाल ॥ मन कसें आवरूं ॥ किती धीर धरूं कसें करूं ॥ किती० ॥ हे बंधु नव्हत मम वैरि खरे ॥ दाविती कसें वरि प्रेम बरें ॥ बोलूनि पाडिती हृदयासि घरे ॥ नको नको मला जिव ॥ विष तरी पाजिव सखे सोडीन ॥ १ ॥

पद—विद्याहरण (राग—भैरवी ताल; केरवा)

कच चूर्ण चाखितां मजा आला, मनुज पशुसम किं झाला ॥ धृ० ॥ दिसतो नर हा, मर्कट–लीला; ऐशा विरोधें मजा आला ॥ न धरि शृंगा, पुच्छ न अंगा, नंदी असा हा; मज गमला ॥ १ ॥

पद—मानापमान [राग—झिंझोटी, ताल झंपा]

नयनें लाजवित बहुमोल रत्ना । जणुं धैर्यधीर धरित धन-दासम धना ॥ धृ० ॥ नमवी पहा भूमि हा चालतांना । सुच वीत तिज तूंचि मजपुढें निर्धना ॥ १ ॥

पद—स्वयंवर (राग—ललित, ताल—त्रिवट]

अचल विचला, दाविल तव अचुक पद माग ॥ धृ० ॥ दिसत पंथ बहु, संशय आला; अचल धर्म तव प्रेमाला ॥१॥

पद—मानापमान [राग—जिल्हा, कवाली]

श्रीनवनवरी भासे ॥श्री०॥ धृ० ॥ स्वपति बुडविला शयनीं सागरीं ॥ कामा कशि ये पतिता नारी ॥ फिरवित सकला चपला भिंगरी ॥ कोणा कधिं ती नच वरी नवरी ॥ १ ॥

पद—संशयकल्लोळ [बंधन वा बांधो]

मृगनयना रसिक मोहिनी ॥ कामिनी होती मंजुळ मधुरालापिनी ॥ नवयौवनसंपन्न रम्य गतिविलासिनी ॥ धृ० ॥ आल्हादक मुखचंद्रहि होता । दृष्टि ती प्रेमरस वाहिनी ॥ १ ॥

पद—एकच प्याला (राग—यमन, ताल—त्रिवट)

लागे हृदयीं हुरहुर । आजि । सुखविषय गमति नच मज सुखकर ॥ धृ० ॥ कांहीं सुचेना कांहीं रुचेना । राहि कुठ स्थिर मति नच पळभर ॥ १ ॥

पद—मानापमान (राग—खमाज, ताल त्रिताल)

या नव नवल नयनोत्सवा । बघुनि मानस हें अनुभवत [illegible] कोमल भावा ॥ धृ० ॥ रणस्नेहाची सुंदर युवती । [illegible] करीं समाप्ती । वाटे अस्त्रचि हें रिपुहार्ती । जिंकाया मम जीवा या ॥ १ ॥

पद—एकच प्याला (राग—अडाणा; ताल त्रिवट)

झणिं दे कर या दीना । प्रेम जलातुर मृतशा दे जल तें या मीना ॥ धृ० ॥ वांच्छा तरी उपकार मधुच्या । या करि संततपाना ॥ १ ॥

पद—स्वयंवर [राग—तिलंग, ताल—त्रिवट]

लपविला लाल गग-मणि, परि दिन अशुभ होत नच, दृष्टि न विफला; मगध-समरपति नव रवि उगवला ॥ ध्रु० ॥ योग्याचि वर मम, सुखविल बाला; शुभ दिन अजिं, सुता वारिल बघ शिशुपाला ॥ १ ॥

पद—विद्याहरण (राग—पहाडी; ताल एक्का)

लोळत कच मुखमधुवारि, त्यांसि तोंचि कर निवारि । भ्रमर योग कमलभोग या धर्मा दूर न करि ॥ ध्रु० ॥ शिक्षेला कच न पात्र; देवयानि, तूंचि शपथ, सफल काम नलिनीनाथ दाखवो न वनि कच यापरि ॥ १ ॥

पद—मानापमान (राग—पहाडी मांड, ताल—धुमाळी)

शशिसूर्यप्रभा गगनाची, ही दासी भूमि तला... सुख मानुवरा भाल हिमकरा स्पर्शाया न धजे ही क... हे चरण मला रविचंद्रकला, सेवा योग्य गमे यांची ॥२॥

पद—एकच प्याला [गरुडध्वनि; ताल—त्रिताल]

ललना मना नच अचलवशंका अणुहि सहते कदा ॥ध्रु०॥ सृजनिं ज्याच्या विधि तरल घे । विमल प्रकृतिसी पुण्यपरम ॥ १ ॥

पद--मानापमान [राग–भैरवी; ताल–धुमाळी]

किती मजेदार हार; शिवमययुवती शरण मदन रचि सुमन नानाकार ॥ ध्रु० ॥ येत हा मदनमित्र रणाला; सैन्य तया अबलाकर माला । फुले फूल; पडे भूल, ज्ञान शूर मनीं चूर। वसंतसेना सरसावे ही, बैरागी समुदायीं हो हाः हाः कार ॥१॥ तोडूंया मुकुल सकल कुमारी; रास रचूं या रुद्र मंदिरीं । पहा हार; हारा मार; ज्ञान लोचन झांकीभार । नाचे कुसुमायुध आनंदें । पुष्पवटी शिव समाधि सामोरा; तोरा फार ॥ २ ॥

पद–एकच प्याला [राग–तिलक कामोद; ताल–एकताल]

प्रणतनाथ ! रक्षि कान्त । करि तदीय असुख शांत ॥ध्रु०॥ अशुभा ज्या योजि दैव । पति लागीं, त्यां सदैव । परिणमवी मगल[illegible]॥ १ ॥

पद–संशयकल्लोळ (जावे मोरे बैया)

साम्य तिळहि नच दिसत मुखाचें ॥ नाव तरी कोरवा शिरावरी ॥ ओळखु येईल चित्र कुणाचें ॥ ध्रु० ॥ मज जवळी असे याहुनि सुंदर प्रीति चितारिणी करिचें प्रतिबिंब सुबक या मूर्तीचें ॥ १ ॥

पद—स्वयंवर [राग—बिहाग, ताल—त्रिवट]

मम आत्मा गमला हा, नकळत नवळत हृदय तळमळत भेटाया ज्या देहा ।।ध्रु०।। एकचि वेळ जरी मज भेटला, जीव कसा वश झाला, भाव दुजा मिटला; वाटे प्राण सखा आला परतुनि गेहा ।। १ ।।

पद—मृच्छकटिक (गुलचमनसे)

भूपती खरे ते वैभव सुख सेविती ।। बहु दास सेवनी दक्ष सदा राहाती ।। अधिकार बळानें राज्यसुत्र चालीती ।। त्यां प्रजा सकळ थोर मान तो देती ।। ह्मणुनि कां त्यांसी सेवावें सांग तूं ।। धनचि कां अधिक मानावें सांग तूं ।। गुण त्यांचि कां न बघावे सांग तूं ।।चाल।। संपत्तीबळाच्या मदें धुंद ते [illegible]ती ।। स्वच्छंद वागती नाहीं तया रीती ।। १ ।।

पद—सौभद्र

रुचती कां तीर्थयात्रा या समयीं त्यांस ती ।। मजवरची प्रेमबुद्धी कां हरिची लोपती ।। दादांना अंधजाची भक्ति कां लागती ।। या कृत्या सहाय्य होती कां वहिनी रेवती ।।१।।

पद—स्वयंवर (राग—देसकर, ताल त्रिताल)

अजि राधा बाला मीच गोपाला ॥ ध्रु० ॥ आलें चारा-
याला धेनूंना; मोहिलें कंठ—मधुबलें कृष्णाला ॥ १ ॥

पद—विद्याहरण (राग—बागेश्री, ताळ झपताळ)

आतां राग देई मना शांततेला ! वीर हा; असुर—संहार
झाला ॥ ध्रु० ॥ कोप दुर्गाचि खरा दुर्बला जाहला, विजय-
दायक मला । वंदी याला ॥ १ ॥

पद—एकच प्याला (राग—कालंगडा, ताल—दीपचंदी)

बघुं नको मजकडे केविलवाणा राजस बाळा ॥ ध्रु० ॥ ये
दिवा ! अपुली ना करुणा । तोंवरी समजुनी, वर्ते अनुकाला॥१॥

पद—सहचारिणी [नाछोडो गरि]

वैभवबळ प्रेमकी ती पुढतीं लोपें क्षणीं ॥ ध्रु० ॥ बळ असे
जसें प्रेमाचें ॥ न तसें चतुरंग चमुचें ॥ निमीष मात्र न टीके
साचें पुढती लोपे क्षणी ॥ १ ॥

पद—एकच प्याला [राग—पहाडी जिल्हा]

लोटूं नका कान्ता । अशी दुरी कान्ता ॥ केवी जगे दिना
मनी ॥ जलतवरहीता ॥ ध्रु० ॥ हेचि चरण माते ॥ जीवन
जगता ॥ मृतची गणा । हे दुरी होता ॥ १ ॥

पद—सहचारिणी (गलियासे गलिये०)

न कधिंहि कपटें नच हटे नच बळें वश होई रामा ॥ क्रर भाषणें ना वश होई रामा ॥ धृ० ॥ कृती निःस्वार्थी मधुर वाणी क्षांती शांती सुचिता ॥ यासी इश वश तशि अभी जाता ॥ १ ॥

पद—शारदा [राहेना गोविंदा]

जरी कुणा श्रीमंताची सून होय शारदा ।। तरी त्यांस साजे ऐसी तिची रूप संपदा ।।धृ०।। बघुनी तीस आकाशींची चांदणी दिपावी ।। नाहीं रूपवंती दुसरी हजारांत ठावी ॥ हंसत थोर सरदारांनीं मागणी करावी ॥ परी मला मनचे मांडे चुरूनि काय फायदा ।। १ ।।

पद—सौभद्र (राग-शंकर भरण, ताल-दीपचं...)

अरसिक किती हा शेला, त्या सुंदर तनुला सोडुनि आला ॥ अरसिक० ॥ धृ० ॥ प्रेमें प्राणपतिला, मी संतो हा अर्पण केला ॥ दुर्मिळ जें स्थळ मजला, तें सहज मिळा या दुर्भाग्याला ॥ तेथुनि कां हा ढळला; त्या सत्संगतिल कैसा विटला ॥ कोंडून ठेविन याला, मज दृष्टीस नल निष्ठुर मेला ॥ अर० ॥

पद—मृच्छकटिक (वृक्षवेल या दोहोंची)

दासी ऐसें मानुनियां कार्य मला सांगतसे ॥ सुदिन काय उगवला आज मनीं वाटतसे ॥ धृ० ॥ मधुर अति सुमनांचा वास यास येत असे ॥ यौवनभर म्हणुनी याचा खास अझुनि पूर्ण असे ॥ १ ॥

पद—शारदा (दूर तूं रूसुनी)

रडसि काय म्हणुनि अशी सांग शारदे ॥ कोण बोललें कीं काय मजसि समजूं दे ॥ पुसुनि पुसुनि नेत्र पहा लाल जाहले ॥ भ्यालिस कीं काय कोणी सांग मारिलें ! ॥ मौन धरिसि हें मनास फार तापदे ॥ १ ॥

पद—सौभद्र—[राग-पीलु, ताल-धुमाळी]

बलसागर तुम्ही वीरशिरोमणी कोठें तरी रमला ॥ आश्वासन जिस दिलें तिला कां विसरूनियां गेला ॥ धृ० ॥ पेरियलें जें प्रीतितरूचें बीज हृदयीं त्याला ॥ अंकुर येऊनी सुदृढ तयांचा वृक्ष असे झाला ॥ सुंदर तुम्ही मूर्तिमान तच्छायेला बसला ॥ चित्र असे हृदयांत कोंदता ठाव न अन्याला ॥ पांडु कुमारा पार्थ नरवरा राखा वचनाला ॥ निश्चय माझा न ढळे जरि हा कंठ कुणी चिरिला ॥ १ ॥

पद—सौभद्र

मन्नेत्र गुंतले ॥ लुब्ध झाले ॥ ज्यांवरि असे ॥ चित्तांत सांचले ॥ तेचि आले ॥ बाहेरी कसे ॥चाल॥ नरवर हे काय बाई ॥ शुद्धमन हें ॥ साक्ष देई ॥ १ ॥

पद—शारदा (माळीण नवतरुणी)

तरुण कुलिन गोरा, हंसत मुख तरुण कुलिन गोरा ॥ पाहिजे मुलीला चतुर सद्गुणी सुंदरसा नवरा ॥ ध्रु० ॥ चाल ॥ पुरवील तिची जो हौस सदा बहुपरी ॥ घालिल शाल जो मायेची तिजवरी ॥ तिळमात्र तिला जो दुःख न देईल घरीं ॥ विद्वानांत हिरा, चकाकत विद्वानांत हिरा ॥ १ ॥

पद—मृच्छकटिक (उभी जवळ खरी)

त्या मदन मनोहररूपीं मन माझें गुंतुनि गेलें ॥ कधिं चाहिन काया त्यासी, प्रेमें ही ऐसें झालें ॥ दिवस तो पूर्ण सौख्याचा येईल मज कवण्या काळें ॥ चाल ॥ गुणरूप चिंतनीं पाहीं ॥ झोंप मज नाहीं ॥ शयनिं मी निजलें ॥ किती तरंग हृदयीं उठले ॥ १ ॥

पद—सौभद्र (कौन जाये ब्रीज)

पुष्पपराग सुगंधित शीतल अतिमंदचरे वनवायु हा ॥ निखिल तरूंतिल पाक्षि उठोनि शब्द करिती किती मंजु हा ॥ पुष्प ॥ ध्रु० ॥ निबिड कुंजमुखीं मोर मयुरी नट्टुनि थट्टुनि नाचति हे ॥ हरिण उडती बहु शशक धांवती गिरिवर डोलत नाग हा ॥ पुष्प० ॥

पद—सौभद्र (बाळा घालोनियां गळां)

पांडुनृपती जनक जया । माता कुंती यदु तनया ॥ धर्म भीम बांधव जया ॥ नामे विजय जो ॥ १ ॥ अर्पियलें या शरीरा तया लोक धनुर्धरा ॥ न फिरे जरी चराचरा ॥ कंठ चिरियला ॥ १ ॥

पद—सौभद्र [राग—जोगी, ताल—धुमाळी]

माझ्या मनिंचें हितगुज सारें ठाउक कृष्णाला ॥
ऐसें असुनी दुःखावरती देतो डागाला ॥ ध्रु० ॥
अर्जुनजीला मज द्यावी हें आपणची वदला ॥
आशा मज बहू दाउनि ऐसा घात करूं सजला ॥
जैसा वरती दिसतो काळा आंतुनही झाला ॥
तारिल ह्मणुनी धरिलें ज्याला बुडवी तो मजला ॥ १ ॥

पद—सौभद्र (राग–पिलु, ताल–धुमाळी)

बघुनि उपवना विरहाग्नीची ज्वाला भडके उरीं ॥
पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूल निपजवी शिरीं ॥
कोकिल–कूजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी ॥
कारंजाचे तुषार भासति अग्निकणाचे परी ॥
सुमंद शीतल सुगंध मारुत येतां अंगावरी ॥
थरथर काळिज कांपे वाटे डाग बसति नानापरी ॥
दे तंतुस हंसही स्त्रीच्या वदनांतरीं ॥
सुखवाया कांता मोर सुनृत्य करी ॥ चाल ॥
जिकडे तिकडे पाहुनि ऐसें होतें मी घाबरी ॥
मजला मग घायाळचि करितो मन्मथ अपुल्या घरीं ॥१॥

पद—सौभद्र (राग–जिल्हा, ताल–धुमाळी)

मज बहुतचि ही आशा होती वहिनी ॥
मत्पतिचा शोध करोनी ॥ त्या कृष्णातें वळवुनि समजावोनी ॥
करिशिल तूं मत्प्रिय ह्मणुनी ॥ चाल ॥
परि झालिस निर्दय तूंही ॥परि०॥ मज आतां थारा नाहीं॥म०॥
॥ चाल ॥ हतदेवा ही व्यर्थ फिरे जन्मोनी ॥
शिणविलि ती माउलि जननी ॥ १ ॥

पद—सौभद्र (दोलेरे जोबन मधुमा, या ठुंबरीच्या चालीवर)

गिरिवर हा सवदागिर आणी सिंधुपंथें नौका भरुनी ॥
पुरुषयुवतिचीं चित्रें मांडी विकण्यास्तव बाजारवनीं ॥
बघुनि वाटतें मन्मनीं या समयीं कीं ॥ बघु० ॥
भूषालंकृत पोर जनीं ॥ ध्रु० ॥ १ ॥

पद—सौभद्र (हाजारा मेरा कानका मोती, या ठुंबरीच्या चालीवर)

सकल जगीं सारखे बंधु ॥ बहुत निर्दय जणुं कपटाचे सिंधु ॥ सकल० ॥ ध्रु० ॥ शालक लक्ष्मी बघती केवळ ॥ नच त्या जरि गुणबिंदु ॥ सकल० ॥ १ ॥

पद—सौभद्र (जो चिदानंदकंद या चा०)

वद जाऊं कुणाला शरण करी जो हरण संकटाचें ॥ मी धरीन चरण त्याचे ॥ अग सखये ॥ मी धरिन ॥ ध्रु० ॥ बहु आप्त बंधु बांधवा प्रार्थिलें कथुनी दुःख मनिंचें ॥ तें होय विफल साचें ॥ अग सखये ॥ ते होय वि० ॥ मम तात जननी मात्र ती बघुनी कष्टती हाल इचे ॥ न चले कांहीं त्यांचें ॥ अग सखये ॥ न चले० ॥ जे कर जोडुनी मजपुढें नाचले थवे यादवांचे ॥ प्रतिकुल होती साचे ॥ अग सखये ॥ प्रतिकुल ॥ १॥

पद—सौभद्र (राग—जिल्हा, ताल—धुमाळी)

असतांना यतिसंन्निध किंचित सुख वाटतें ॥
परि एकटी बसतां हाय दुःखें मन दाटतें ॥ चाल ॥
चार मास जाउनियां आतां येइल तों दिन मृत्यूचा ॥
ऐसें मानसि येउनि शयनीं तळमळत निशि सारी ॥
मग हें चित्त फाटतें ॥ अस० ॥ १ ॥

पद—सौभद्र (जिंनी केसरीलो या गभ्र्याच्या चा० ताल दादरा.)

बहुत छळियलें नाथा व्यर्थ शिणविलें ॥ ध्रु० ॥ लावियलें तुम्हां ध्यायाला ॥ यतिवेषा ऐशा वीरा—आणिलें—निंदा—स्पद—तेला ॥ तें सारेंही विसरुनी शेवटीं सौख्य दावियलें ॥ बहुत० ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग—तिलककामोद, ताल—एकताल)

नुरलें मानस उदास । गुंगवि ध्यान प्रभूचें । पदकमलीं वास रुचे ॥ ध्रु० ॥ पुलकित काया अहा ! । असुख सकल होई नाश । भव-भय गेलें लयास ॥ १ ॥

भाग २ ला समाप्त.

गंधर्व—गायनसार



श्री. बाल गंधर्व.

गंधर्व-गायनसार



श्री. बाल गंधर्व.

श्रीशंकर प्रसन्न.



गंधर्व गायन सार.

भाग २ रा.

पद—कान्होपात्रा [अभंग—राग—मांड, ताल कवाली]

विषयाचे संगती । नाश पावले निश्चिती ॥ १ ॥ भगें पडलीं इंद्राला । भस्मासुर भस्म झाला ॥ २ ॥ चंद्रा लागला कलंक । गुरु पत्नीसी रमला देख ॥ ३ ॥ रावण मुकला प्राणासी । म्हणे कान्होपात्रा दासी ॥ ४ ॥

पद—मेनका (राग—जोगी—ताल केरवा]

थोर पुरुष परि मुक्त न झाला, जरि नच बहु जन तो सुख-विला मार्गचि सोपा परमार्थाला ॥ १ ॥

पद—(राग—झिंझोटी)

जाके मथुरा या कान्हानें घागरिया फोरी ॥ घागरिया फोरी । चुनरी मारी फारी ॥ धृ० ॥ ऐसी रीत तुज कौन सिखावे, किसन करत बलजोरी ॥ १ ॥ सास हटेली नणंद चुगेली, दिर देवत मुझे गारी ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरिधर-नागर, चरणकमल चित हारी ॥ ३ ॥

पद—कान्होपात्रा [राग—जोगी, ताल—केरवा; अभंग]

माझ्या जिवाचे जीवन । तो विठ्ठल निधान ॥ १ ॥ उभा असे विटेवरी । वाटी प्रेमाची शिदोरी ॥ २ ॥ आलि-याची धणी ॥ निवारी तो चक्रपाणी ॥ ३ ॥ भेटा दयेच्या सागरा । विनवितसे कान्होपात्रा ॥ ४ ॥

पद

डोळे हे जुल्मि गडे, रोखुनि मज पाहुं नका ।
जादुगिरी त्यांत पुरी, येथ उभे राहू नका ।
काशिदा मी काढुं कशी, त्यांत होती फार चुका ।
बोचे सुई फिर फिरुनी, वेळ सरुया जाई फुका ।
खळबळ किती होय मनीं,
जमतील त्या सर्व जणीं;
हंसतिल त्या संधि बघुनि,
आग उगा लाऊं नका ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा [राग-धनी ताल त्रिवट]

तुम्हीं खरे थोर सागर असता । थांग न परि मज देता ॥
उलट मात्र लघुता घेता ॥ ध्रु० ॥ दुरित सकल नाशा नेता ॥
थोरवी सानांची गाता ॥ म्हणुनी वंदन हें ताता ॥ १ ॥

पद—शारदा

कधिं करिती लग्न माझें तुज ठावें ईश्वरा ॥ ध्रु० ॥ वाढली
उंच ही किती ॥ हंसुनी बोलती ॥ नाक मुरडिती ॥ स्त्रिया पर
भारां ॥ १ ॥ मैत्रिणी वदति टोंचुनि ॥ शब्द ते मनीं ॥ जाति
भेदुनी ॥ सुरीच्या धारा ॥ २ ॥ जनक तो नांव काढिना ॥
माय सुचविना ॥ हौस मग कुणा ॥ कोण झटणारा ॥ ३ ॥

पद-शापसंभ्रम [नमुनी शिवा बलवंत०]

धाडुनि दिधलें दासीसह मीं पत्र तिला करिंचें या ॥ अजुनि
कशी ती प्राप्त न झाली हंसकन्यका या ठायां ॥ ध्रु० ॥
भाव न कळला मानुं तयांतिल आहे तरि चतुरा ती ॥ योग्य
न जरि मी तत्प्रीतीला हार कसा हा देती ॥ ह्मणतिल गुन-
जन काय तिला ही वागवि.कां मनिं भीती ॥ किंवा सखिनें
दिधलें नाहीं अनुमत मजासि वराया ॥ १ ॥

पद—रामराज्यवि० (लांगे तुझे डोळे फुटले०)

राम करीं जरि नृपपद गेलें ॥ खचित तुझें तें दैवचि
फुटलें ॥ समजे भिक्षापात्रचि आलें भरताच्या हातीं ॥ १ ॥
कौसल्येची मग ती सत्ता ॥ पडतिल तव शिरीं तीच्या लत्ता ॥
येणाऱ्या श्रीतें निजहातां ॥ लाथ नको मारूं ॥ २ ॥ होशिल
मग कौसल्या-दासी ॥ मिथ्या गर्वे कां तूं फुगसी ॥ आत्म
सुताच्या वदनीं घालिसि ॥ रक्षा राक्षसिणी ॥ ३ ॥

पद—शाकुंतल (अत्रिवरी ताल—त्रिताल)

जाईं परतोनी, बाळा, जाईं परतोनी ॥ निष्ठुर मी तुज
टाकुनि जातें, येसि कशाला माझ्या मागोनि ॥ ध्रु० ॥ जन्मतांच
तव जननी गेली सोडुनि तुज या तपोवनीं ॥ मींच पाळि
लाड करोनी, कांहि न अडलें कीं तुझें । गेलें जरी, काय उ
तुज, सांभाळितील बाबा तुजलागुनि ॥ जाईं परतोनि० ॥ १ ॥

पद—मृच्छकटिक (युवराज शिवाजीस०)

धनहीन असा होय सखे ह्मणुनी त्यावरी ॥ जडलें मम मान
हें जाण झडकरी ॥ ध्रु० ॥ मजसम ज्या असति जगीं वारय
षिता ॥ त्यांनीं सधन पुरुष बघुनि त्यांसि सेवितां ॥ लो
हें दूषण जन देति तत्त्वतां ॥ तें होईल मज सहन कसें सां
अंतरीं ॥ १ ॥

पद—(राग–पिलु.)

राधे कृष्ण बोल मुखसे । राधे कृष्ण बोल । तेरो क्या लगेगा मोल ॥ ध्रृ० ॥ हातपाव नही हिलना । दसबीस कोस नहीं चलना । कुछतीरे गांठ नहीं छुटना । तेरो मनकी गुंडी खोल ॥ १ ॥

कैसे तुम गणिकाके अवगुण नागिने नाथ ॥ कैसे तुम भिल्लनीके जुठे बोर खाये हो ॥ कैसे तुम सभामें द्रौपदीकी लाज रखिये हो । कैसे तुम कजन पधारे हो । कैसे सुदामाके छिनमें दरिद्र हरे हो । कैसे तुम उग्रसेन बंदीसे छुडाये हो । मेरे बेर इती देर मुख भिंज रहेना ॥ ए बंधु दिनानाथ कहासे कहलाये हो ॥

कौल बचन हे आया । तु मायाने मन लुभाया ॥ इस मायीने घेर घिराया ॥ इस ठकनीका पल्ला छोड ॥ २ ॥

पद–रामराज्यवियोग [सवाई]

रामासि अनुकूल असती त्यांचे पाडिन दांत तरीच खरी मी ॥ मंत्रीजन कुलगुरु यांचा तो मोडिन बेत तरीच खरी मी ॥ कैकयि वळवुनि निजकरीं भूपा व्यसनी घालिन तरीच खरी मी ॥ रामा वन भरता सिंहासन देईन तरीच जाण खरी मी ॥१॥

पद--शारदा (चाल-ये अशी, बैस मजसराशिं०)

यमपाश, गळ्यासीं ज्यास लागला त्यास, मला कां देतां । कां मांस विकुनि, धर्मास वांकडे जातां ? ॥ चाल ॥ पाळिलें घातलें खाया आंजवरि ॥ बकरीस मोल बहु याया, ज्यापरी । ही तुमचि मुलीवर माया, कां खरी ? ॥ जगतांत, सदय सकलांत माउली-तात, मुलीला असतां ॥ मग तुह्मीच इतके कठोर कांगे होतां ॥ १ ॥

पद--राग पिलु.

सारे छंद सोड ॥ कन्हैया ॥ सोड सोड सोडी खोड ॥ धृ० । राधे राधे करीत येसी ॥ दहीं दूध लोणी हरिसी ॥ ठेवी दड वोनी वस्त्रासी ॥ गोपिकांची मोडी खोड ॥ १ ॥

पद--शापसंभ्रम (सोच समजनादान०)

होय मला अपशकुन असा कां ॥ उत्साहाचा भंग करी का ॥ धृ० ॥ हृदयनिवासी प्राणसख्याचे ॥ अनुतापें मन पाल टलें कां ॥ १ ॥ तुज फसवीलें त्या खोटीनें ॥ कर्षिजलें त्या सांगितलें कां ॥ २ ॥ हात सखे दे धांवत जाऊं ॥ टाकिशि तूं हीं मंद पदें कां ॥ ३ ॥

पद—शारदा [अधम हे तुफानी०]

श्रीमंत पतीची राणी मग थाट काय तो पुसतां ॥ बंगला नवा नवकोनी फुलबाग बगीच्या भवता ॥ किति दासी जोडुनी पाणी जी म्हणतिल कामाकरितां ॥ सुग्रास बसुनि खायाला ॥ मऊ शय्या लोळायाला ॥ गुज गोष्टि काळ जायाला ॥ ना काय धाम ना धंदा ॥ ही फुगेल बघतां बघतां ॥ १ ॥

पद—शाकुंतल (उद्धवा शांतवन कर जा०)

मर्यादा सोडुनि वदणें योग्य न, हें मजला ठावें ॥ परि-धीर मनीं धरवेना, हें दुःख किती सोसावें ॥ ज्या प्रेम निरंतर करिती, हितगुजही त्यां सांगावें ॥ आणुनि त्या राजेंद्राला । भेटवाचि सत्वर मजला ॥ त्यावांचुनि शेवट झाला । भा सांखचा मनिं समजावें ॥ जरि ममता मजवर तुमची प्रिय माझें हेंचि करावें ॥ १ ॥

पद—मेनका (राग—पहाडी, ताल—केरवा)

दर्शन घ्यावें शुभकर वेळा, अखिलहि गर्व पळाला ॥ध्रु०॥ सुखचि सजीवा, सुख निर्जीवा, सुखमय विश्व जहाले या समयाला ॥ १ ॥

पद—शारदा (चाल—जळो ग याचें स्नान०)

बघुनि त्या भयंकर भूता, फोडिली तिनें किंकाळीं ॥ या हृदया चरका बसला, कळवळे मनही त्या काळीं ॥ परि बाप तिचा तो कसला चांडाळ पूर्वीचा वैरी ॥ तिळभरही द्रवला नाहीं उलट त्या बिचारिस मारी ॥ ती दीन भयाकुळ मुद्रा रात्रंदिन दिसते बाई ॥ रडविलें तिनें मज कितिदां दचकतें भिउनि शयनींही ॥ १ ॥

पद—शारदा.

मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली ॥ वाटते दुजा सुदाम मज दिसेल त्या स्थळीं ॥ध्रु०॥ दाखवावयास मला तात नेत त्याकडे ॥ साक्षसा रुचेल कां पहावया जसा बळी ॥ १ ॥

पद—मृच्छकटिक (जो मम नयन०)

जो या नगरा भूषण खरा ॥ जैसा भाळीं शोभे हिरा ॥ ज्याच्या सद्गुणनगानीं गिरा ॥ रंगली सुजनांची ॥ १ ॥ निर्धन असतां धनदापरी औदार्यातें अंगीं धरी ॥ दुर्दैवानें छळिलें तरी ॥ शील न सोडी जो ॥२॥ करि जो दीनवरती दया ॥ लोकीं वागे पाहुनि नया ॥ वाहिली ही मीं काया तया ॥ निर्मल नांवानें ॥ ३ ॥

पद—संत कान्होपात्रा [ताल त्रिवट—रितभात समझाई)

नम्रभाव गुरुपाई मम हा । व्यक्त करित अजि प्रेमें शुभ-
दिनीं ॥ धृ० ॥ मज भवती सुख सारें जमलें । गुरु नमना-
विण वायां गेलें । मोह न मातें अन्य उपाये ॥ १ ॥

पद—संत कान्होपात्रा (धिरजधरें मनमें)

मन धरणी करि मी प्रियकरा । आजवरी प्रेमें गोड बोलला ।
वदत रुचिर बोला ही बाला ॥ धृ० ॥ प्रियतम होईन शपथ
गळ्याची । कधिं नच दासीला झिडकारा ॥ १ ॥

पद—मेनका (अंजन वीन रसना)

अंतचि जरी नसला, सकल सुखा अंतरला । नंदन वन
विरलें; द्यावें मरण मला ॥ धृ० ॥ विटणें मेलें, यम जरी
चीवला । मारुनी जाळुनी मज पावा नवसाला ॥ १ ॥

पद—मेनका (चाल—रेहो पि हरवा)

सर्वा नर खरा गुरु बरवा । भावीक भावा देई अबला
निजपति देवा ॥ धृ० ॥ अहंकार उलटा, नर जरी खोटा
म्हणे स्त्रीस कुलटा; न्याय द्यावा ॥ १ ॥

पद—मानापमान (चाल—गोकुलमाईल)

मानस कां बधिरावें हें ? । बघतसे खिन्न जगता ॥ धृ० ॥
ाह शृंखला या । दृढ बद्ध पायां । बल ना भेद तया ।
ीता ॥ १ ॥

पद–मानापमान (राग–खमाज, ताल–दादरा)

विनयही न वदतां, नाथा, नाहीं मी बोलत आतां ॥ध्रु० रण रुचिरा रीती, ना शोभे प्रेमाती । विनयवती मी कां नाथा ॥ १ ॥

पद–मानापमान (राग–जोगी-मांड)

सवतचि भासे मला । दूती नसे ही माला ॥ ध्रु० ॥ न एकांती सोडी नाथा, भेटूं न दे हृदयाला ॥ १ ॥

पद–मानापमान (राग–जिल्हा ताल–दादरा)

मजला प्रेम सहातें सुचवील योजना ॥ ध्रु० ॥ रसना मु वरी बोलवील नयना । करुनी कंठ मधुर रुचविल म जल्पना ॥ १ ॥

पद—मेनका [राग–कॉफी ताल–त्रिवट]

भक्तिभाव हा, घ्या सेवा, रुचिर रूप तपनांत ता गोड गोड मज बोलवा ॥ ध्रु० ॥ अमरकलासी मग देह धरी सत्य सत्य त्या राखवा ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा [राग–पिलु, ताल–एकताल]

शरणांगत गौरवा ॥ पदवंदनि गुण सेवनी । लाभ अस मज द्यावा ॥ ध्रु० ॥ चरणि बालिका जडली । खचित जाहल कृतार्थ ॥ सार्थ होउद्यां सेवा ॥ १ ॥

पद—मेनका (राग—भैरवी; ताल—त्रिवट)

देहा विसरले नच; मग सुख जाणा हीन वासना ॥ धृ० ॥
अभ्यास सतत सकलही केला, डोल फोल न कळत पळाला
देह संग परी बुद्धि सोडीना ॥ १ ॥

पद—मेनका (राग—मांड, ताल—केरवा)

देहा दिधलें सेवेला, या योगे जय लाभला ॥ धृ० ॥
उठा झटा प्रियकर कार्याला, सुखद मार्ग मी दाविला, मुनि
विश्वामित्र तप करोनिया ईश भजनांत आणिला ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग—काफी, ताल—त्रिवट)

खचित उगिच भय दावी मजला । असता गुरुवरी भार
सगळा । अशुभ घोर तो माझा सरला ॥ धृ० ॥ तापवि भानु
कितिहि शरीर भुला । विमल मेघ परी वर्षुनी सुजला । करी तो
भवकरी शांतलतेला ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग सारंग ताल त्रिवट)

दारि उभें जरी संकट तें । परी मी हंसुनी खेळवि त्यांतें ॥
भक्ति-परा-मति भय ना धरितें ॥ धृ० ॥ भानुकरें तम तें
पळतें । पळते बघुनी गुरुशी अघ तें । अभया गुरुपदीं तशि
मी वरितें ॥ १ ॥

पद—मेनका [राग भीमपलास—ताल त्रिवट]—

भूषण संसारा विमला वनिता—वश जरी जीव पसार ॥ ध्रु०॥ प्रेमळ जिवन या अधीकारा जीव पोचता मोक्षच दुसरा ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा [राग भीमपलास—ताल एकताल]

देवा धरिले चरण । भक्ति सुगति जगिं मजला । भा बोल रुचवि कोण । सकल तुज विमो मान ॥ ध्रु० ॥ सा थोर जिवासि । रक्षितोसि हृशिकेशी । अचल तुझ्या पद दीन । भय नुरवी होत लीन ॥ १ ॥

पद—मेनका [राग—शंकरा ताल—त्रिवट]

सन्निध ही सेवा, सेवा तीच सुखदा विरही जनाला ॥ध्रु० सौख्य असे विमल करा, सहजाचि मारा मग विरहाला ॥ १

पद—शापसंभ्रम (चाल—वृक्षवेल या दोहोंचि०)

या तरुणा तांबुल द्यावया लाज वाटते ॥ मला० ॥ ध्रु० अल्पहि नाहीं परिचय याचा आजची पाहिला ॥ ह्मणु मना धीर न होई तूंच गडे दे हा त्यातें ॥ १ ॥

पद--शापसंभ्रम (बलसागर तुम्ही०)

अनुपम सुंदर म्हणुनि लोचनीं भरली ही मूर्ती ॥ छिद्र पाहुनी हेंच धांवसी कां रे मजवरती ॥ १ ॥ तयाकडे मन ओढी, अंगें मज उचलुनि धरिती ॥ धैर्यहि सोडी, अशांत तुही लोटिशि कां पुढतीं ॥ २ ॥ तनु कांपे ही धर्म दरारे, श्वास उष्ण निघती ॥ अशा संकटीं गांठिशि मजला निंद्य तुझी रीती ॥ ३ ॥ अनुपम सुंदर० ॥

पद--शापसंभ्रम (नृपममता)

तेथेंच उभी कीं आलें ॥ जागी कीं शयनीं निजलें ॥ नाकळे ॥ दुःख सौख्य कीं झालें ॥ उत्सविं कीं व्यसनीं पडलें ॥ नाकळे ॥ मी स्तब्धची अथवा बोलें हसलें कीं रोदन केलें ॥ नाकळे ॥ चाल ॥ करूं काय, लागली हाय, यास सदुपाय कोणते कथिले ॥ पुसुं कुणा कोणत्या बोलें ॥ नाकळे ॥ १ ॥

पद-- पुंडलीक (गायन करुनी०)

हरण करुं या । मलिनता मुनिवरगुणगण तें गाउं या ॥ अंगणिं या सारवुं या । गृहिं सुविमल जल तें आणुं या ॥ आश्रम हा । शोभवुं या । नवविकसित कुसुमें थाटुं या ॥ मुनि-राणा । निरखुनि यां । खलकृत अघ विलया नेउं या ॥ १ ॥

पद—दामाजी (अहा मोरे सया)

तो हा गिरिधारी ॥ खलांचा सदा वैरी जो दीनांच सहाकारी ॥ दास बनूनि जरी मासवि शरीरी ॥ बुडाल मवांधारीं ॥ मी कां झालों दुराचारी ॥ तो० ॥ महार बनुनि हरि ये दरबारीं ॥ दामाजीचा कैवारी ॥ जो हा राहे उभ द्वारीं ॥ १ ॥

पद—शापसंभ्रम (युवराज शिवाजिस सुखी०)

अति पापी मी चांडाळिण विफलजीविता ॥ निर्लज्जा नष्ट धवा लोकनिंदितां ॥ ध्रु० ॥ जन्मुनी जननीस मात्र व्य शिणविलें ॥ तातादिक इष्ट जनां शोकिं लोटिलें ॥ ब्राह्मणव करुनि घोर पाप जोडिलें ॥ वृत्त तिचें परिसुनि तुज ला कोणता ॥ १ ॥

पद—शापसंभ्रम [जो या नगरा०]

आधिंच मन्मथ दुःसह मला ॥ त्यांतुनि वसंत सरसावला तिसरा मलयानिल झोंबला ॥ माझ्या अंगा गे ॥ १ ॥ इतु क्यांताचि हा उगवे शशी ॥ याची पीडा साहु कशी ॥ ज्वरि तांगावरि व्हावी जशी ॥ वृष्टिच वन्हीची ॥ २ ॥ अथव शीतार्तावरि पडे ॥ प्रभातीं हिमजल तैसें घडे ॥ खर वि किंवा ज्याला चढे ॥ अहि त्या चावावा ॥ ३ ॥

पद—मृच्छकटिक (" उभी जवळ खरी० ")

त्या मदनमनोहररूपी मन माझें गुंतुनि गेलें ॥ कधिं
नाहिन काया त्यासीं, प्रेमेंही ऐसें झालें ॥ दिवस पूर्ण
होण्याचा, येईल मज कवण्या काळें ॥ चाल ॥ गुणरूपचिंतनीं
आदीं ॥ झोंप मज नाहीं ॥ शयनिं मी निजले ॥ किति तरंग
हृदयीं उठले ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग—पहाडी, ताल—कवाली)

नवला न माना, सांच जाणा । विष मानी विषयास॥धृ०॥
सह सौख्य सोडी । विठल जोडी । छंद फंद वा उरला ना
विषयास ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग—अरबी, ताल—एकताल)

पतित पतित कधीं न ह्मणा । मज न गणा दीन हीन । दोष
पहा आवडे न ॥ धृ० ॥ कुस्करून सुमन—सुमां ना अपमाना ।
सौरभगुणें होत ना उणा ? ॥ १ ॥ जीवपुष्प तव चरणां । अर्पित
कान्हा, भक्तिविना नाहिं वासना ॥ २ ॥

पद—सौभद्र [शिव शिव फसले या चा०]

व्यर्थ मी जन्मले थोर कुळीं ॥ लागला सर्व हा फांस
गळीं ॥ व्यर्थ० ॥ धृ० ॥ नच ठावें स्वातंत्र्य कसें तें ॥
मंदीरीं वास मुळीं ॥ व्यर्थ० ॥ १ ॥ गरीबा पोटीं येतें तरी
ती ॥ मज नच देते बळी ॥ व्यर्थ० ॥ १ ॥

पद—प्रभावती.

चक्रगदाधर सुंदर हरी तूं ॥ पितांबर धरकटी मोरम
शिरीं धरी जो ॥ धृ० ॥ सहकारीला जेवि किरीटी ॥ भ
समरीं राहुनि निकटीं ॥ तेविं प्रियकरा साह्य संकटीं स्व
धरीं तूं ॥ चक्रगदाधर० ॥ १ ॥

पद—वीरतनय (राग—माळकंस, ताळ—दीपचंदी)

तुझी अन्यथा ती कराया कृती ॥ अह्मां मानवांची
ना गती ॥धृ०॥ अनंता अहोरात तारावती ॥ त्वदाज्ञेसि न
शिरीं मानिनी ॥ तुझी० ॥ १ ॥ दयाळा सुविश्वास तुझ्याव
सदा ठेउनि साधु ते राहती ॥ तुझी अन्यथा० ॥ २ ॥

पद—सत्यविजय (राग-जंगला ताळ-दादरा)

केतकिचा वास करी धुंद सदा नागिणिला ॥ सहव
करुनि सुखें पदरीं घे तूं मजला ॥ स्वातीजल घनबिंदु
करी चातकिला ॥ त्यापरि तूं शांतवि रे मन रमण
अबला ॥ १ ॥

पद—मृच्छकटिक.

माडिवरी चल ग गडे जाऊं झडकरी ॥ पाहुं सदय दान
मूर्ति ती बरी ॥ धृ० ॥ मी अधीर दर्शनासि फार अंतरीं
होइल सुख मजसि तया पाहिल्यावरी ॥ १ ॥

भाग २ रा समाप्त.



श्री. बाल गंधर्व.

गंधर्व-गायनसार



श्री. बाल गंधर्व.

श्रीशंकर प्रसन्न.



गंधर्व गायन सार.

भाग ३ रा.

पद—(चाल—नमामि महिषासुर मर्दिनी)

[illegible] शंकर सुखकर हो ॥ हिमधरस्थित विकट काननिं
[illegible] प्रियकरी शुभकरी सुंदरी तिजवरी भुलत कैलास
[illegible] ॥ शंकर सुखकर हो ॥ ध्रु० ॥ पद्मजा मुररिपुसहि
[illegible] इंद्रा चंद्रा सकलां । सोडुनी पर्णनीं कुंदरदनिं ॥
[illegible] जाहली शिववरानुसारिणी । पर्वताग्रशिरोमणी ॥
[illegible] कन्या सद्गुणी हर्षनिर्भर करग्रहणी झाला महादेवास
[illegible] शंकर सुखकर हो ॥ तुम्हां ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग—देशी, ताल केरवा; अभंग)

पतितपावन ह्मणविशी आधीं । मग कां उपाधी भक्त मागें ॥ १ ॥ तुझें म्हणवितां दुजे अंगसंग । उणेपणा सां कोणाकडे ॥ २ ॥ सिंहाचें भातुकें जंबुक पै नेतां । थोरांचि माथा लाज वाटे ॥ ३ ॥ ह्मणे कान्होपात्रा देह समर्पण करावा जतन ब्रीदासाठीं ॥ ४ ॥

पद—मेनका (राग—बागेश्री; ताल—त्रिताल)

प्रियकर वश मजला, विमल यश हेंचि, गुरुपदा दे चढला ॥ धृ० ॥ स्त्रीपुरुषा गुरुता येतां । विरह—कलह म शांत झाला ॥ १ ॥

पद—मेनका (राग—तिलककामोद; ताल—त्रिताल)

समज अनावर कामा क्रोधा; सहन जरा करीना विरो ॥ धृ० ॥ औषध गुणकर प्रेमळ सेवा, शांत चित्त देई नवबोध क्रोध शमवा नच बाधा ॥ १ ॥

पद—मेनका (राग—बिलावल; ताल—त्रिवट)

असुख होत सुख, स्वार्थ सोडिला, करुणरसाला जी बिलगला ॥ धृ० ॥ मृत्युंजय मंत्र मिळाला, कार्यभार सुख सदा गमला ॥ १ ॥

पद—कान्होपात्रा (राग—भैरवी, ताल—केरवा; अभंग)

अगा वैकुंठींच्या राया । अगा विठ्ठल सखया ॥ १ ॥ अगा नारायणा । अगा वसुदेव नंदना ॥ २ ॥ अगा पुंडलीक वरदा । अगा विष्णू तूं गोविंदा ॥ ३ ॥ अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखी आतां ॥ ४ ॥

पद—मेनका (राग—जीवनपुरी; ताल—त्रिवट)

अजि पुरवा ही हौस प्रियकरा, मातृपदीं तनु मम बसवा ॥ ध्रु० ॥ स्त्री जगाला स्त्रीच विधाता; होत नाहिं जरि माता, विश्व-सुखीं विष कालवा ॥ १ ॥

पद—मेनका [गजल; ताल-केरवा]

भुलेचि थारा पराक्रमाला, ह्मणोनि देवा जन्म आला ॥ध्रु०॥ परोपकारें सुखीच झाला; तनूसि झिजवित जगांत ठेला; तो विकविलो या सेवेला ॥ १ ॥

पद—मेनका [राग-बिहाग; ताल-त्रिवट]

सत्य, सत्य नच, फोल पाला; जरि नच सत्यें सौख्या मिळा ॥ १ ॥ सुखफल सत्या नियमें आलें, तप झालें सुख-साधन मजला ॥ १ ॥

पद–स्वयंवर (राग यमनः ताल त्रिवट)

नाथ हा माझा मोही खला; शिशुपाला भारी झाला, वी रुक्मी शिशु सम आणिला ॥ ध्रु० ॥ वीरा लोळवि, मग ह धरुनी, कर रत्नाला जणुं हा त्याला ॥ १ ॥

पद–स्वयंवर (राग भूप; ताल त्रिवट)

सुजन कसा ? मन चोरी ! अग हा–चोरी !–यदुकुलनंद ॥ ध्रु० ॥ सहज नेत्र मिडे, सहज मोह पडे; सहजचि कर मम हृदय हें वेडे; विलीन-लोचन-मार्ग शिरत घरीं ॥ म चोरी ॥ १ ॥

पद–मानापमान (ताळ दादरा)

चंद्रिका ही जणुं ठेवि या स्नेहें कमलांगणी । कुमुद बांध श्यामला मेघा तस्कर मानोनी ॥ ध्रु० ॥ चंद्रसदनसम मंडल मेघांनीं वेढियलें । शोभाधन विपुल तें लपवितां कोठें शोधित वेगें दशदिशा भूवरी सकल आले । आतां सरसावले दिसत ही या क्षणीं ॥ १ ॥

पद–स्वयंवर (राग–कॉफी, ताल–त्रिवट.)

रूप बली तो नर-शार्दूल साचा, क्षणीं विनाशित रिपुमा मनिंचा ॥ ध्रु० ॥ खला देखी, मग भूल फेकीं, नयन–माण मनासि जिंकी, क्षणीं विनाशित स्वभाव रिपुचा ॥ १ ॥

पद–संशयकल्लोळ (शाम घुंगट पट खोलो या चालीवर)

संशय कां मनिं आला ॥ कळेना ॥ कारण काय तयाला ॥ ॥ ध्रु० ॥ आळ वृथा कीं, चित्र दिलें मी ॥ कोणा पर पुरुषाला ॥ १ ॥ कोपुनि गेले; ही मज लागे ॥ हळ हळ थोर मनाला ॥ २ ॥

पद–मानापमान (राग–जिवनपुरी, ताल–त्रिवट.)

प्रेममार्गें जीव जगीं या नटला । एकचि रस प्याला ध्रु० ॥ नवरसी भिन्नरस हे शृंगाररराजा नवदल ल्याला ॥ १ ॥ सकलां किरण रंगा दावी इंद्रधनुर्षी जननयनाला ॥ २ ॥

पद–स्वयंवर (राग–भैरवी ताल–दीपचंदी.)

[illegible] ना तव जाया, आर्या, सुख विलासीं सोडीना विनया ॥ ध्रु० ॥ वस्त्राच्छादना विरल कराया भिजविता [illegible] मम काया ॥ १ ॥

पद–विद्याहरण (जिल्हा–खमाज, ताल–पंजाबी.)

मधु मधुरा तव गिरा मोहना, भासे निशेची भूल मना [illegible] ॥ [illegible] म्हणूं तरी ती भ्रांती, मधुरिपु हाचि खरा ही स्व[illegible] [illegible]पारी मन धरणी ही करवि हें नवल होई जना [illegible]

पद–मानापमान (राग–पहाडी, ताल–केरवा.)

खरा तो प्रेमा ना धरि लोभ मनिं ॥ ध्रु० ॥ नभिं
हितरत भास्कर तापत, विकसत पहा नलिनी ॥ ना धरी
पीडित जन देखतां, स्वसुखा त्यागी दया । जन
हरण हेंचि सुख, सदया देवराया ॥ दर्शन गुणवंत
नाचवी प्रेमलहरी । गुणरसपान हेंचि सुख, प्रेम तया
जनीं ॥ १ ॥

पद–स्वयंवर (राग–मालकंस, ताल–त्रिताल.)

वैरी मारायाला; ही गोशाला ॥ ध्रु० ॥ प्रमुदित माता,
बल नमविता; करि मृदुल दूध अरि-वध; सबल अबला ॥

पद–एकच प्याला (राग–भिमपलास, ताल त्रिवट)

छळिती या हृदया अदया । भ्रांत मनोरचना
॥ ध्रु० ॥ मातृजीवना झिजवुनी जगतीं । अंती
तयास त्या निधना ॥ १ ॥

पद–एकच प्याला (राग–सावन, ताल रूपक)

वशी मी प्रभो निंदु तुला । नच बघें तुझ्या दोषा । क्रो
रूप ...षातें । अणुहि धरीं न मी । दोषी स्वभाला ॥ ध्रु०
मनिंचा छळितें माझें असें । मजनीं त्याच्या । नच ब
मनासि अमर दसेला ॥ १ ॥